**प्रेस नोट** ता. १६/०८/२०१७

## कोंढवा पोलीस स्टेशन चे अनोळखी महिला खुन प्रकरणातील आरोपीला शाखा युनिट २ कडुन जेंरबद करुन गुन्हयाची उकल

कोंढवा पोलीस स्टेशन गु र न ६१/२०१७ भा द वि क ३०२,२०१ मध्ये हगवणे नगर, स्काय पार्क बिल्डींगचे पाठीमागे मोकळया प्लॉटमध्ये एका महिलेची धारधार शस्त्राने वार करुन, डोक्यात दगड घालून जिवे ठार मारुन अर्धवट जळालेल्या स्थितीत डेड बॉडी मिळाली होती. त्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता सदरचा गुन्हा हा महिलेचा खून करुन त्याची ओळख पटु नये म्हणुन आरोपीने मयत महिलेचे अंगावर ज्वलंतशील प्रदार्थ टाकुन तिस पेटवुन दिल्याने पोलीसांसमोर एक मयताची ओळख पटवुन आरोपीचा शोध घेवुन त्यांना जेरबंद करण्याचे मोठे आवाहन होती म्हणुन मा.रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर, मा. श्री रविंद्र कदम, सह पोलीस आयुक्त, पुणे शहर, मा प्रदिप देशपांडे अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा. पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, मा. सुरेश भोसले सहा पोलीस आयुक्त, यांनी गुन्हे शाखेतील सर्व शाखांना सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत सक्त सुचना व मार्गदर्शन केले होते.

त्या अनुशंगाने सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना गुन्हे शाखा युनिट २ मधील सहा पोलीस फौजदार उदय मोरे, पो हवा दिनेश गडांकुश यांना सदर गुन्हयातील संशयीत आरोपीची माहिती मिळाल्याने त्यांनी युनिट २ चे प्रभारी अधिकारी सतिश निकम यांना सागितली असतांना त्यानी स्टाफसह म्हाडा कॉलनी, वारजे येथे छापा टाकुन सदर गुन्हयातील संशयीत आरोपी नामे ऋषीकेश श्रीकांत गाडे वय २२ रा. बी-६५, खोली क्र. ७, व्ही आय टी कॉलेजचे मागे, अप्पर इंदिरा नगर पुणे यास ताब्यात घेवून त्याचेकडे विचारपुस करता त्याने सदर गुन्हयाची कबुली देवुन सदरचा गुन्हा हा त्याने व त्याचा मित्र विकास उर्फ विकी नवनाथ जठार यांनी केल्याचे सागितले.

आरोपी नामे ऋषीकेश श्रीकांत गाडे हा मित्र नामे विकी जठार यास भेटण्यासाठी मार्च महिन्याचे पहिल्या आठवडयात सायंकाळी ०७.०० वा. अप्पर इंदिरा नगर येथे गेला असता विकी जठार याने त्यास सुशिक्षीत इंडस्ट्रीयल सोसायटी, हगवणे नगर, स्काय पार्क बिल्डींगचे पाठीमागे, कोंढवा बुद्रुक या ठिकाणी बोलाविले तेव्हा तो तेथे गेल्यानंतर काही वेळाने विकी जठार रा. अप्पर इंदिरा नगर व त्यांचा मित्र त्याचे सोबत मुलगी नामे राणी रा. अप्पर इंदिरा नगर, असे विकीचे स्प्लेंडर गाडीवरुन ट्रिपलसीट तेथे आले. त्यावेळी तेथे थोडावेळ बसुन त्यानी व राणी हिने दारु पिली व दारु पिले नंतर मुलगी नामे राणी हिस विकी जठार याने तु माझे पत्नीसोबत फिरु नकोस असे सागितले असता तु का फिरतेस, अशी विचारणा केली असता तिने तुझी पत्नी लहान आहे काय? तिला समजत नाही काय असे म्हणाल्याने त्याचा विकी जठार यास राग आला तेव्हा त्याने राणी हिस शिवीगाळ केली त्यावेळी राणी हीने तु मला बोलावलेस म्हणुन मी आले आणि आता शिवीगाळ का करतोस असे विचारणा केली असता विकी याने त्याचेकडील कोयत्याने व विकीचा मित्र याने त्याकडील सुऱ्याने राणीचे अंगावर व तोंडावर वार केले. तेव्हा ती खाली निप्चीत पडली व तिची काही हालचाल होत नव्हती, तेव्हा विकी जठार याचे मित्रांने दगड उचलून तीच्या डोक्यात मारला व संशयीत आरोपी ऋषीकेश श्रीकांत गाडे याने विकी जठार याचे गाडीतून बाटलीमध्ये पेट्रोल काढून राणीचे अंगावर ओतले व विकी जठार याने काडीपेटीचे काडीने आग लावली व तेथून पळून गेले अशी कबुली दिली आहे.

आरोपी ऋषीकेश श्रीकांत गाडे हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर जेजुरी येथील बँक ऑफ महाराष्ट्र ची ४३ लाख रक्कम लुटल्याचा गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयामध्ये त्यास मोका अन्वये कारवाई करण्यात आली आहे सदर गुन्हयात तो जामीनावर असुन त्याचे बिबवेवाडी, हडपसर पोलीस स्टेशनला मारामारी व खंडणीचे गुन्हे दाखल आहेत.

तसेच विलास उर्फ विकी नवनाथ जठार, रा. अपर इंदिरानगर याचे विरुध्द खून, दरोडयाची तयारी तसेच मारामारीचे चार गुन्हे असुन सध्या तो एमपीडीए मध्ये नाशिक जेल याठिकाणी आहे.

